'वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता' पदावर
दि.०१/०१/२०२० रोजी काम करणाऱ्या
कर्मचाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासुची
प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८
क्र.प्रशा/१२/कावि/ ५५ /२०२१
दिनांक ०३/ ०२ /२०२१

वाचले : क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११
२) 'वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता' पदाची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतासुची आदेश क्र.प्रशा/१२/कावि/१९५/२०१९ दि. ११/०२/२०१९
३) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/०१/कावि/११७५/२०१३ दि. २९/०८/२०१३
४) आदेश क्र.प्रशा/०२/कावि/७४/२०२१ दि.२८/०१/२०२१
५) प्रशासन विभागाकडील दि. ०२ / ०२ /२०२१ चा मान्य प्रस्ताव

आदेश

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११ अन्वये "यापुर्वी प्रसिध्द झालेली अंतिम सेवाजेष्ठतासुची, चालु वर्षात पुन्हा नव्याने तात्पुरती (Provisional) प्राथमिक जेष्ठतासुची तयार करताना विचारात घेतली जाणार नाही व प्रसिध्द करण्यात येणार नाही. केवळ त्या संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional) प्राथमिक जेष्ठतासुची तयार करून प्रसिध्द करावी", असे निर्देश आहेत. तसेच प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/२०१३ दि.३१/०५/२०१३ मधील मुद्दा क्र.५ मध्ये **"ज्या संवर्गात संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश नसेल अशा संवर्गाची फक्त अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्द करण्यात येईल."** असे नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **'वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता'** पदावर काम करणाऱ्या ०२ कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासुची उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर दि.०१/०१/२०१९ ते दि. ३१/१२/२०१९ या कालावधीत **उपरोक्त पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियमित नियुक्त कर्मचाऱ्यांचा समावेश नसल्याने,** तसेच **आदेश क्र.प्रशा/०३/कावि/८०७/२०१९ दि.०७/०९/२०१९ अन्वये कायमस्वरुपी बदलीने रुजू दिनांकापासून म्हणजे दि.२८/०८/२०१९ पासून बदलीने नियुक्ती देणेत आलेली आहे.** सदरचे आदेशामधील अर्टी व शर्ती मधील मुद्दा क्र.१० मध्ये **श्री.आमले कुंडलिक तुकाराम यांची सेवाज्येष्ठता पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या संवर्गाचे सेवाज्येष्ठता यादीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील रुजू दिनांकापासून दर्शविण्यात यावी,** असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता पदाचे दि.०१/०१/२०२० रोजीचे **सेवाज्येष्ठता यादीमध्ये अ.क्र.३ वर श्री.कुंडलिक तुकाराम आमले यांना दि.२८/०८/२०१९ या रुजू दिनांकापासून ज्येष्ठताक्रम देण्यात आला आहे.** त्यामुळे **'वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता'** पदावर **दि.०१/०१/२०२०** रोजी काम करणाऱ्या नियमित ०३ कर्मचाऱ्यांची फक्त अंतिम सेवाजेष्ठतासुची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतिम जेष्ठतासुची महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.२१/१०/२०११ मधील सुचनांनुसार तयार केली आहे.

ही अंतिम सेवाजेष्ठतासुची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज / याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
उपआयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासुची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

प्रशासन अधिकारी (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता पदाची दि.01/01/2020 रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासूची

वेतनश्रेणी 9,300-0-34,800 ग्रेडवेतन 4400

अ.क्र.	संगणक क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	प्रवर्ग	शैक्षणिक पात्रता	जन्म दिनांक	वैद्यकिय सामा. कार्यकर्ता रुजु तारीख	नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा)	मनपामध्ये कामास लागलेची		सेवानिवृत्ती दिनांक	शेरा
								पद	तारीख		
1	7926	बोत्रे महादेव तुकाराम	खुला	बी.कॉम., एम.एस.डब्ल्यु.	11/08/1971	11/02/2000	सरळसेवा	वैद्यकीय सामा. कार्यकर्ता	11/02/2000	31/08/2029	
2	7902	भोसले सुजाता प्रसन्न	अनुसुचित जाती	बी.ए., एम.एस.डब्ल्यु, पी.एस.डब्ल्यू.	01/05/1967	14/02/2000	सरळसेवा	वैद्यकीय सामा. कार्यकर्ता	14/02/2000	30/04/2025	
3	12823	आमले कुंडलिक तुकाराम	खुला	बी.ए., एल.एल.बी., एम.एस.सी.आय.टी., एम.एस.डब्ल्यू., डी.एल.एल.एल.डब्ल्यू., पी.जी.डी.जे. ॲण्ड एम.सी.	20/07/1972	28/08/2019	सेवा वर्ग	वैद्यकिय सामा. कार्यकर्ता	28/08/2019	31/07/2030	क्र.प्रशा/3/कावि/807/2019 दि.07/09/2019 अन्वये सेवावर्ग

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.

सही/-
उपआयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.